# हॉटेल आणि रेस्टॉरंट असो .चे आज पश्चिम विभागीय अधिवेशन

## दिलीप वेंगसरकर करणार उद्घाटन

**नाशिक (प्रतिनिधी) :**

'हॉटेल ॲण्ड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया' या संस्थेतर्फे ७ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर या कालावधीत नाशिकमध्ये संस्थेचे १९वे विभागीय अधिवेशन होणार असून यानिमित्ताने पश्चिम विभागातील हॉस्पिटॅलिटी उद्योगातील अनेक नामवंत व्यावसायिक नाशिकमध्ये येणार आहेत. या अधिवेशनाचे उद्घाटन भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते होणार आहे अशी माहिती असोसिअशन चे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी दिली .

सुमारे ३ वर्षा>च्या खंडानंतर हे पश्चिम विभागीय अधिवेशन होत असून या अधिवेशनात अनेक हॉटेल व रेस्टॉरंटचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, गुंतवणूकदार आणि उद्योगातील दिग्गज सहभागी होणार असून ते विविध विषयांवर विचारमंथन आणि संवाद करतील हॉस्पिटॅलिटी उद्योगापुढील आव्हाने आणि असणाऱ्या संधीची माहिती, नवे तंत्रज्ञान व नव्या उत्पादनाची माहिती तसेच नेटवर्किंगची संधी या अधिवेशनामुळे मिळणार असून पर्यटन क्षेत्रात महत्त्वाचे शहर असणाऱ्या नाशिकची निवड या अधिवेशनासाठी करण्यात आली असून या अधिवेशनामुळे नाशिकमधील वाइन पर्यटनासोबतच धार्मिक, कृषी, सांस्कृतिक, साहसी पर्यटन तसेच त्याच्याशी संबंधित अनेक सेवांना मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असेही प्रदीप शेट्टी म्हणाले. हिअर टू विन' या थीमवर आधारित या अधिवेशनात मोठ्या संख्येने हॉटेल व रेस्टॉरंट व्यवसायिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन देखील शेट्टी यांनी केले.

### ३ वर्षांच्या खंडानंतर अधिवेशन

रॅडिसन ब्ल्यू येथे होत असलेल्या या अधिवेशनाचे उद्घाटन शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता होत आहे. विशेष म्हणजे, सुमारे ३ वर्षांच्या खंडानंतर हे अधिवेशन होत असून त्यात अनेक हॉटेल व रेस्टॉरंटचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, गुंतवणूकदार आणि उद्योगातील दिग्गज सहभागी होणार आहेत व ते विविध विषयांवर विचारमंथन आणि संवाद साधतील. हॉस्पिटॅलिटी उद्योगापुढील आव्हाने आणि असणाऱ्या संधीची माहिती, नवे तंत्रज्ञान व नव्या उत्पादनाची माहिती तसेच नेटवर्किंगची संधी या अधिवेशनामुळे मिळणार असून पर्यटन क्षेत्रात महत्त्वाचे शहर असणाऱ्या नाशिकची निवड या अधिवेशनासाठी करण्यात आली आहे.

### अधिवेशनामुळे अनेक सेवांना मिळणार चालना

या अधिवेशनामुळे नाशिकमधील वाइन पर्यटनासोबतच धार्मिक, कृषी, सांस्कृतिक, साहसी पर्यटन तसेच त्याच्याशी संबंधित अनेक सेवांना मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असेही प्रदीप शेट्टी म्हणाले. नाशिकमध्ये स्टार हॉटेल्सची संख्या वाढत असून गेल्या तीनच वर्षांत मेरियट, रेडिसन ब्ल्यू, सयाजी यांसारख्या हॉटेल्सचे आगमन झालेले असून नुकतेच युकेमधील हॉटेल स्वीस ट्राफलगारची एंट्री झाली आणि १०० कोटींच्या गुंतवणूकीची घोषणाही त्यांनी केली आहे.